लोकमत

# राजगुरुनगर येथे मतदार दिन साजरा

## विविध उपक्रम : प्रात्यक्षिके, रॅली, पथनाट्यांतून जनजागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरुनगर :** राष्ट्रीय मतदारदिनी राजगुरुनगर येथे महसूल खात्याच्या पुढाकाराने प्रात्यक्षिके, रॅली, पथनाट्ये आदी उपक्रम आयोजित करून मतदार जागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. मतदारांची नोंदणी व ओळखपत्र यांबाबत या वेळी मार्गदर्शन करण्यात आले.

हुतात्मा राजगुरु महाविद्यालय व साहेबराव बुट्टे-पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी शहरातून जनजागृती रॅली काढली.



ठिकठिकाणी पथनाट्ये सादर केली.

सहायक जिल्हाधिकारी आयुष प्रसाद या वेळी म्हणाले, ''खेड तालुक्यात ३ लाख ६ हजार मतदारांची नावनोंदणी झाली आहे. आतादेखील जे लोक नावनोंदणी करतील, त्यांना लोकसभेला मतदान करता येईल. दहा टक्के मतदारांनी आजपर्यंत कधीही मतदान केले नाही, अशा मतदारांशी स्थानिक बूथ अधिकारी प्रत्यक्ष संपर्क साधणार आहेत. तालुक्यातील १५ ठिकाणी सातत्याने ५० टक्क्यांपेक्षा कमी मतदान होत आहे, अशा ठिकाणी मी स्वत: भेट देऊन समुपदेशन करणार आहे.

या वेळी सुरेश गोरे, आयुष प्रसाद, सुचित्रा आमले, राजेश कानसकर, प्रा. मच्छिंद्र मुळुक, डी. यू. उगले, महेश खंडागळे आदी उपस्थित होते.


Hello Pune Gramin
Page No. 2 Jan 29, 2019
Powered by: erelego.com


डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख